दै सकाळ - दि 23/11/2023

# ...रवले दागिने...सापडली माणुसकी

## ...हिलेला मिळाले दागिने; ऑटोचालकाचे पोलिसांकडून कौतुक

...ळ वृत्तसेवा

..., ता. २२ : दिवाळीचा
...ी साजरी करून सासरी
... एका महिलेची बॅग
... विसरली. त्या बॅगमध्ये
... रुपये किमतीचे साडेसहा
...चे दागिने होते. पोलिसांनी
...ून काढून परत मिळवून
...ध्ये सीसीटीव्ही फुटेज,
...ने केलेले प्रयत्न आणि
...चा प्रामाणिकपणा
...ाचा होता. दागिने परत
...र आमची दिवाळी

नांदेड पोलीसांनी भाऊबीज स्वरुपी साजरी केल्याची भावना महिलेने व्यक्त करत पोलीसांचे आभार मानले.

शहरातील प्रभाग नगर भागात दिवाळीनिमित्त माहेरी श्रीतेजा निलेश काळबांडे (रा. हदगाव) या आल्या होत्या. दिवाळी झाल्यावर त्या सासरी जाण्यासाठी श्रीनगर येथून ऑटोरिक्षाने बसस्थानकात गेल्या. दरम्यान त्यांची बॅग ऑटोमध्ये राहुन गेली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी थेट वजिराबाद पोलीस ठाणे गाठले. बॅगेत सोन्याचे दागिने असल्याचे सांगितले.

पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी याबाबतची शोध घेण्याची जबाबदारी गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक शिवराज जमदडे, पोलीस जमादार दत्तराम जाधव, शरदचंद्र चावरे, विजयकुमार नंदे, रमेश सुर्यवंशी, अरुण साखरे, इम्रान शेख, भाऊसाहेब थोरात यांच्याकडे सोपविली. श्रीनगर ते बसस्थानक या भागातील विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले. ज्यामध्ये ऑटोचालकाचे फुटेज हस्तगत झाले परंतु क्रमांक अस्पष्ट असल्याने शोध घेण्यास अडथळे येत होते.

दरम्यान, पँथर ऑटो संघटनेचे अध्यक्ष गंगाधर प्रभाकर विणकरे यांची मदत घेऊन ऑटोचालकाचा शोध घेतला. ऑटोचालकाचे नाव अशोक गंगाराम कांबळे (रा. वैशालीनगर, पाटबंधारेनगर) असल्याची खात्री झाली. त्यावरुन त्यांच्याकडे विचारणा करता त्यांनी सदर महिलेची बॅग जशास तशी माझ्याकडे असून महिलेबाबत काही एक माहिती मिळत नसल्याने मी सदरील बॅग कोणाकडेही सुपुर्द केली नसल्याचे सांगितले. तसेच प्रामाणिकपणे कळवून बॅग पोलिसांसमक्ष हजर केली. त्यामध्ये सदर महिलेचे साडेसहा तोळ्याचे दागिने मिळुन आले.



नांदेड : महिलेचे दागिने ऑटोरिक्षात राहिल्यानंतर प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल पोलिसांच्या वतीने बुधवारी ऑटोचालक अशोक कांबळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

### ऑटोचालकाचा सपत्नीक सत्कार

■ पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते बुधवारी (ता. २२) ऑटोचालक अशोक गंगाराम कांबळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. श्री. कोकाटे यांनी स्वतःकडील एक हजार रुपयांचे बक्षिस त्यांना दिले. तसेच श्रीतेजा काळबांडे यांनी देखील ऑटोचालक यांचा सपत्नीक आहेर व बक्षीस देऊन सत्कार केला. यावेळी अतिरिक्त पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव, पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड आदी उपस्थित होते. तसेच ऑटो संघटनेचे अध्यक्ष गंगाधर विणकरे आणि हरवलेल्या बॅगचा शोध घेणाऱ्या वजीराबाद पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार करण्यात आला.